# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर- वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे
फोन.नं. ०२२-२९४५१००१
Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र १२३** **दिनांक- १२/०५/२०२१**

**अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथकाने बेकादेशीररित्या गावठी हातभट्टीची दारु विक्री करीत असतांना एका महिलेस केली अटक .**

दिनांक ११.०५.२०२१ रोजी ११.०० वा.चे सुमारास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर च्या नेमणुकीतील पोशि.३६६० केशव शिंदे यांना त्यांचे खास बातमीदारामार्फत राईगाव भाईंदर पश्चिम या ठिकाणी महिला नामे श्रीमती सुरेखा भरत पाटील ही रहाते घराचे लगत असलेल्या टेम्पररी पडवीमध्ये गावठी हातभट्टीची दारु विक्री करीत आहे, अशी बातमी मिळाली.

त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. एस.एस.पाटील यांचे सुचनेप्रमाणे पोलीस पथकासह महिला नामे सुरेखा भरत पाटील वय ४० वर्ष रा. घर नं. ६७८ पाटील निवास, शेगड गल्ली, राईगाव, उत्तन रोड, भाईंदर पश्चिम या ठिकाणी ११.५० वा. छापा टाकला असता महिला नामे सुरेखा भरत पाटील वय ४० वर्ष ही गावठी हातभट्टी दारु विक्री करीत असताना मिळुन आली.

सदर कारवाईत आरोपीतास महिला पोलीसांचे मदतीने ताब्यात घेवून घरालगतल असलेल्या पडवीमध्ये शोध घेतला असता प्लॅस्टीकच्या पिशव्यामध्ये गावठी हातभट्टीची दारु अंदाजे ९०लिटर किंमत ७,२५०/- रु, दोन काचेचे ग्लास, एक प्लॅस्टीक मग, तीन प्लॅस्टीक ग्लास असा मुद्देमाल मिळुन आल्याने तिचे विरुध्द भाईंदर पोलीस ठाणे येथे पो.शि./३६६० के एन शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार भाईंदर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. २१२/२०२१ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ (ई), अन्वये गुन्हा दाखल आहे.

सदरची कारवाई डॉ.श्री महेश पाटील, पोलीस उप.आयुक्त(गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर विभागाचे व.पो.नि.श्री. संपतराव पाटील, अ.मा.वा.प्रति.कक्ष, भाईंदरचे अंमलदार पो.हवा./२२६९ उमेश पाटील, पोहवा.१६३ रामचंद्र पाटील, पो.शि/३६६० शिंदे तसेच भाईंदर पोलीस ठाण्याचे नेमणुकीतील मपोशि.१३३६ माधवी गवस यांनी केली आहे.

Scanned with CamScanner